पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७३ /२०२३ दि. २८/०४/२०२३

**"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"**

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत रविवार दि. ३०/०४/२०२३, दि. ०७/०५/२०२३, आणि दि. १४/०५/२०२३ रोजी **"आनंद पथ, रस्ता आनंदाचा"** अर्थात **"हॅप्पी स्ट्रीट"** हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) तीन हात हात नाका येथून सर्व्हिस रोडने नितीन कंपनीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना तीन हात नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने तीन हात नाका कडून हरिनिवास सर्कल मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) नितीन कंपनी येथून सर्व्हिस रोडने तीन हात नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना धर्मवीरनगर कट येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने धर्मवीरनगर कडून परमार्थ निकेतन रोड मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) भक्ती मंदिर रोडने तीन हात नाका सर्व्हिस रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सर्व्हिस रोड येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व वाहने प्रशांत कॉर्नर मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) मोदी ह्युंदाई रोडने तीन हात नाका सर्व्हिस रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सर्व्हिस रोड येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व वाहने पाचपखाडी मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) एचडीएफसी बॅंक कट रोडने तीन हात नाका सर्व्हिस रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सर्व्हिस रोड येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व वाहने पाचपखाडी मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना रविवार दि. ३०/०४/२०२३, दि. ०७/०५/२०२३, आणि दि. १४/०५/२०२३ रोजी सकाळी ०६:३० ते ०८.३० वाजेपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(डॉ. विनयकुमार मे. राठोड)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, वागळे व पो.निरी. वागळे वाहतूक उप विभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी.